| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br><br>**प्रेसनोट** | २०२६<br><br>CB/08/2026 |
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक ०४.०२.२०२६** |

# खारघर येथे दरोडा टाकणा-या टोळीतील ३ आरोपींना गुन्हे शाखेने केली अटक

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी जास्तीत जास्त मालमत्तेचे गुन्हे उघड करून आरोपी अटक करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

दिनांक १२/०१/२०२६ रोजी फिर्यादी व साक्षीदार असे खारघर पोलीस ठाणे हददीतील सेक्टर २० मधील कॅनेरा बॅंके समोरील रस्त्यावर स्वस्त दरात सोन्याचे दागिने खरेदी करण्यासाठी एजंट राज याचे सांगण्यावरून त्यास भेटण्याकरीता गेले होते. तेथे एक सफेद रंगाची एरटीगा कार आली व कार मधील अनोळखी इसमांनी ते पोलीस असल्याचे सांगुन त्यांनी फिर्यादी यांचे हातातील रु.१३,२५,०००/- रू. रक्कम असलेली पैशांची पिशवी जबरदस्तीने स्वत:चे ताब्यात घेवुन एजंट राज यास इरटीगा कार मध्ये बसवुन सोबत घेवुन गेले म्हणुन खारघर पोलीस ठाणे गु.रजि.नं. २२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८ (४),३(५) अन्वये गुन्हा नोंद आहे.

मध्यवर्ती गुन्हे शाखेकडील तपास पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची सखोल पाहणी केली असता आरोपी यांनी इरटीगा कारला बनावट नंबर प्लेट लावुन गुन्हा केलेला असल्याचे समजले. तसेच आरोपी हे इरटीगा कार व्यतिरीक्त आणखीन मोटार सायकल वरून आल्याचे देखील निष्पन्न झाले. तपासामध्ये घटनास्थळाचे व आरोपींच्या इतर ठिकाणांचे तांत्रिक विश्लेषण केले. रेकॉर्डवरील आरोपींची माहिती काढुन गुन्हयामध्ये ८ ते १० आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. तांत्रिक माहितीच्या आधारे त्यांचे ठावठिकाणे काढुन वेगवेगळी पोलीस पथके तयार करून दिनांक २६/०१/२०२६ रोजी २ आरोपी घणसोली, नवी मुंबई येथुन व दिनांक २७/०१/२०२६ रोजी १ आरोपी सीबीडी बेलापुर, नवी मुंबई येथुन ताब्यात घेवुन अटक केले. तिन्ही अटक आरोपींना दिनांक ०६/०२/२०२६ पावेतो मा. न्यायालयाने पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे.

**अटक केलेल्या आरोपींची नावे :-**

**१) विशाल बाजीराव तुपे वय ३५ वर्षे धंदा - चालक राह. साईराम अपार्टमेंट रूम नं. ३०६, समर्थनगर, घणसोली गाव, नवी मुंबई**

**२) रोहीत राजाराम शेलार वय २६ वर्षे धंदा - चालक, राह. रूम नं. ३५९ से. ०४, कोपरखैरणे, नवी मुंबई मुळ राह. मु. खावली पो. आसेर ता. वाई जि. सातारा**

**३) मनोज अंकुश भंडारी वय ३७ वर्षे राह. स्वामी समर्थ चाळ, पिसवली रोड, शिवाजी नगर, रामवाडी कल्याण पुर्व ता. कल्याण जि. ठाणे**

**आरोपींवर यापुर्वी दाखल असणारे गुन्हे :-**

| अटक आरोपी विशाल तुपे याचेवर दाखल गुन्हयांची माहिती | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **पोलीस ठाणे** | **गुन्हा रजि. क्र.** |
| ०१ | गोवंडी पोलीस ठाणे | २२२/२०२३ भादवि कलम ३९५, ४२०, ४१९, १२० (ब) |
| ०२ | सानपाडा पोलीस ठाणे | ९२/२०२३ भादवि कलम ४२०, ४०६, ३४ |
| ०३ | पनवेल शहर पोलीस ठाणे | ५०७/२०२३ भादवि कलम ४२०, १७०, ३४ |
| ०४ | विक्रोळी पोलीस ठाणे | ४३४/२३ भादवि कलम १७०,४२०, ३४ |
| ०५ | भिवंडी पोलीस ठाणे | २०/२०२० भादवि कलम ४२०, १२०(ब), १७० |
| ०६ | खारघर पोलीस ठाणे | २१७/२०२४ भारतीय दंड संहिता ३९५,१२०(ब), १७०, ३२३, ३६३, ५०४, ५०६,३४ |

| अटक आरोपी रोहीत शेलार याचेवर दाखल गुन्हयांची माहिती | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **पोलीस ठाणे** | **गुन्हा रजि. क्र.** |
| ०१ | गोवंडी पोलीस ठाणे | २२२/२०२३ भादवि कलम ३९५, ४२०, ४१९, १२० (ब) |
| ०२ | सानपाडा पोलीस ठाणे | ९२/२०२३ भादवि कलम ४२०, ४०६, ३४ |
| ०६ | खारघर पोलीस ठाणे | २१७/२०२४ भारतीय दंड संहिता ३९५,१२०(ब), १७०, ३२३, ३६३, ५०४, ५०६,३४ |

| अटक आरोपी मनोज भंडारी याचेवर दाखल गुन्हयांची माहिती | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **पोलीस ठाणे** | **गुन्हा रजि. क्र.** |
| ०१ | गोवंडी पोलीस ठाणे | २२२/२०२३ भादवि कलम ३९५, ४२०, ४१९, १२० (ब) |

**आरोपींकडून हस्तगत मालमत्ता :-**

१) १५,१४,०५०/- रु किमतीची एक पांढऱ्या रंगाची मारूती कंपनीची इरटीगा कार, मोटार सायकल, विविध कंपन्यांचे मोबाईल फोन, रोख रक्कम, व इतर मुद्देमाल

सदरची कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल शिंदे, सपोनि/सतिश भोसले, सपोनि/सचिन कोकरे, सपोनि/श्रीनिवास तुंगेणवार, सपोनि/महेश जाधव, पोउपनि/राहुल भदाने, सहा.पोउपनिरी/मंगेश वाट, सपोउपनिरी/सचिन शिंदे, पोहवा/४४७ नितीन जगताप, पोहवा/४८३०, संजय राणे, पोहवा/२१६९ महेश पाटील, पोना/१९३६ सतिश चव्हाण, पोना/२८८३ निलेश किंद्रे, पोना/२८३० अजय कदम, पोना/२८३३ सचिन टिके, पोना/३२८४ सोमनाथ काळे, पोना/३२१६ राहुल वाघ, पोना/३१५४ दिलीप ठाकुर, पोशि/३४४ नवनाथ पाटील, मपोशि/४०११ पुजा वैदय यांनी केली आहे.